DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २५/०९/२०१८ |
| नोंदणी दिनांक | : | २३/१०/२०१८ |
| निकाल दिनांक | : | २५/११/२०२५ |
| कालावधी | : | ७व, २म, ०दि. |

## विशेष न्यायाधीश तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पुणे यांचे न्यायालयात
## [पिठासीन अधिकारी - श्रीमती कविता द. शिरभाते]

**फॉर्म नं. XXXII**
**[ न्यायनिर्णयाचे शीर्षकपृष्ठ ]**

**भाग – 'अ'**
[क्रिमीनल मॅन्युअल चाप्टर (vi) अनुच्छेद ४४ (i)]

**विशेष (बाल संरक्षण) खटला क्र. ४१०/२०१८** **निशाणी क्र. ५९**
*[CNR No. MHPU01-012983-2018]*

| | |
|---|---|
| प्रथम खबरी अहवाल माहिती / गुन्हा आणि पोलीस स्टेशन | गुन्हा क्र. ४३४/२०१८, पोलीस स्टेशन, कोंढवा, पुणे. |
| अभियोग पक्ष/तक्रारदार/फिर्यादी | **महाराष्ट्र शासन**<br>तर्फे<br>पोलीस निरीक्षक, कोंढवा, पुणे. |
| अभियोग पक्षातर्फे विशेष सरकारी वकील | **श्रीमती ए. व्ही. भगत** |
| आरोपी | **महेश्वर बिंदूमाधव ठाकूर**<br>वय– ४८ वर्षे, धंदा– वॉचमन<br>राहणार- शंकर कामठे यांच्या भाडयाच्या खोलीत, गल्ली नं. ३, लक्ष्मी नगर, कोंढवा बु., पुणे. |
| आरोपीतर्फे वकील | **श्री. एस. पी. साळुंखे** |

**भाग 'ब' ( पॅरा ४४(ii) प्रकरण ६ क्रिमिनल मॅन्युअल )**

| | |
|---|---|
| गुन्हा घडला तारीख | **मार्च २०१७ ते जुलै २०१८** |
| प्रथम खबरी अहवाल दिनांक | **०२/०८/२०१८** |
| दोषारोपपत्र दिनांक | **२५/०९/२०१८** |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by KAVITA DILIP SHIRBHATE
Date: 2025.11.26 17:22:39 +0530

shoneekapoor.com

| | |
|---|---|
| दोषारोप निश्चित दिनांक | २८/०८/२०२४ |
| पुरावा सुरूवात दिनांक | ०६/०२/२०२५ |
| युक्तीवादाचा दिनांक | २१/११/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी राखून ठेवल्याचा दिनांक | — |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | २५/११/२०२५ |
| आरोपीच्या शिक्षेबाबतचा दिनांक | लागू नाही. |

## आरोपीचा तपशील

| अ. क्र. | आरोपीचे नांव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | दोषमुक्त केले किंवा शिक्षा सुनावली | शिक्षा काय दिली | अटक झाल्या पासून न्यायनिर्णयापर्यंत आरोपी कारागृहात होते का? असल्यास कलम ४२८ फौ.प्र.सं. नुसार सुट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **महेश्वर बिंदूमाधव ठाकूर** | ०२/०८/२०१८ | **न्यायाधीन बंदी** | भा.दं.वि.कलम ३७६(२)(एफ), ३७६(२)(आय), ३७६(२)(जे), ३७६(२)(एन), ३७६(३), ३२३, ५०६(१), लैं. गु. बा.सं. का. कलम ४, ६, १० | **दोषमुक्त केले** | **नाही** | — |

## भाग 'ब' ( पॅरा ४४(iii) प्रकरण ६ क्रिमिनल मॅन्युअल )
## ( अभियोगपक्षातर्फे / आरोपीतर्फे / न्यायालयातर्फे साक्षीदारांची यादी )

| अभियोग पक्षातर्फे साक्षीदार | | |
|---|---|---|
| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
| सा.क्र.१ – नि.क्र. ३५ | 'अ' | तक्रारदार |
| सा.क्र.२ – नि.क्र. ५१ | 'ब' | पिडिता |
| सा.क्र.३ – नि.क्र. ५३ | 'क' | पिडितेची आई |

| आरोपीतर्फे साक्षीदार | | |
|---|---|---|
| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
| — | — | — |

| न्यायालयातर्फे साक्षीदार | | |
|---|---|---|
| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
| — | — | — |

shoneekapoor.com

## ( अभियोगपक्षातर्फे / आरोपीतर्फे / न्यायालयातर्फे निशाणी दिलेल्यांची यादी )

**'अ' – अभियोगपक्षातर्फे -**

तोंडी पुराव्याव्यतिरिक्त अभियोग पक्षाने खालील कागदपत्रांकडे न्यायालयाचे लक्ष वेधले -

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | फिर्याद | ३६ |
| २. | छापील फिर्याद | ३७ |
| ३. | तक्रारदार/साक्षीदार क्र. १ चा फौ.प्र.सं. कलम १६४ नुसार नोंदवलेला जबाब | ३८ |
| ४. | पिडिता/साक्षीदार क्र. २ चा फौ.प्र.सं. कलम १६४ नुसार नोंदवलेला जबाब | ५२ |
| ५. | रासायनिक विश्लेषण अहवाल | ५७ |

आरोपी पक्षातर्फे खालीलप्रमाणे कागदपत्रे मान्य करण्यात आली-

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | आरोपीचा लैंगिकक्षमता चाचणी अहवाल | ३९ |
| २. | घटनास्थळ पंचनामा | ४० |
| ३. | अटक पंचनामा | ५४ |
| ४. | पिडितेचा वैद्यकीय तपासणी अहवाल | ५५ |
| ५. | पिडितेचा वय तपासणी अहवाल | ५६ |

**'ब' आरोपीतर्फे -**

| अ.क्र. | कागदपत्राचे वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| — | — | — |

**'क' न्यायालयातर्फे -**

| अ.क्र. | कागदपत्राचे वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| — | — | — |

**'ड' महत्त्वाचे पुरावे -**

| अ.क्र. | कागदपत्राचे वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| — | — | — |

***



shoneekapoor.com

## न्यायनिर्णय
## ( घोषित दिनांक - २५/११/२०२५ )

१. आरोपीविरूध्द सदरचा खटला हा भारतीय दंड विधान कलम **३७६(२)(एफ), ३७६(२)(आय), ३७६(२)(जे), ३७६(२)(एन), ३७६(३), ३२३, ५०६(१),** तसेच लैंगिक गुन्हयापासून बालकांचे संरक्षण कायदा कलम **३(बी) सह कलम ४(२), ५(एल) सह कलम ६, ५(एम) सह कलम ६, ५(एन) सह कलम ६, ९(एल) सह कलम १०,९(एम) सह कलम १०, ९(एन) सह कलम १०** चे अंतर्गत दोषारोप ठेवून चालविण्यात आला. (पिडित मुलगी, तिचे नातेवाईक यांची नांवे आणि त्यांचे राहण्याचे ठिकाण गुप्त राखण्याकरिता न्यायनिर्णयात नमूद केलेले नाही).

### अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की,

२. फिर्यादी ही कोंढवा बुद्रूक, पुणे येथे परिवारासह राहत असून, तिची मोठी बहीण ही तिचे पती, पिडिता, मुलगा यांचेसह तिच्या घरापासून पाच मिनीटांच्या अंतरावर राहण्यास आहे. आरोपी हा पिडितेचा वडील आहे. पिडिता ही तिच्या मोठया बहिणीच्या मुलीची मुलगी असून ती इयत्ता ६वीत कोंढवा येथील शाळेत शिक्षण घेत आहे. शाळेला सुट्टी लागल्या की पिडिता व तिचा भाऊ तिच्या घरी येऊन राहत असत.

३. दिनांक ३०/०७/२०१८ रोजी फिर्यादीच्या नातीचा वाढदिवस असल्याने पिडिता ही दिनांक २८/०७/२०१८ रोजी तिच्या घरी राहायला आली होती. दिनांक ३०/०७/२०१८ रोजी वाढदिवस झाल्यानंतर रात्री ०८.०० वाजता पिडितेचे आई-वडील घरी जाण्यास निघाले, परंतु पिडिता घरी गेली नाही. त्यावेळी आरोपीने तिला घरी चलण्यास धमकावले असता, फिर्यादीने तिला सकाळी पाठवते असे सांगून तिला घरीच ठेऊन घेतले. त्यानंतर दिनांक ०१/०८/२०१८ रोजी फिर्यादीने पिडितेला तिच्या घरी जाण्यास सांगितले असता, ती घरातून खाली उतरली, त्यावेळी पिडिता तिच्या घरी गेली असेल तिला वाटले. काहीवेळाने फिर्यादी खाली गेली असता, पिडिता ही तिच्या मावशीच्या घरी असल्याचे तिला दिसले. त्यावेळी तिने घरी का गेली नाहीस असे विचारले, परंतु तिने काही सांगितले नाही. तिचा पडलेला चेहरा तिच्या लक्षात आल्याने तिने पिडितेकडे चौकशी केली असता, पिडितेने असे सांगितले की, "तिचे वडील अर्थात आरोपी महेश्वर ठाकूर हे तिच्याबरोबर गंदी हरकत करतात व त्यास नकार दिल्यास

मारहाण करतात, धमकावतात. पिडितेने तिला असेही सांगितले की, मार्च २०१७ मध्ये कोंढवा बुद्रूक येथील जत्रा असताना पिडितेची आई तिच्या भावास जत्रेस घेऊन गेली त्यावेळी पिडिता ही घरी एकटीच होती, आरोपी याने घराचा दरवाजा बंद करुन पिडितेला जवळ घेऊन तिची छाती दाबली व त्याने त्याचे कपडे काढून पिडितेला तिचे कपडे काढण्यास सांगितले. त्यास तिने नकार दिला असता आरोपीने तिच्या आईला मारण्याची धमकी दिली. त्यामुळे पिडिता घाबरूप गप्प बसली. त्यावेळी आरोपीने पिडितेच्या लघवीच्या ठिकाणी बोटांनी चाळे केले. दुस-या दिवशी पिडितेने सदर घटनेबाबत आईला सांगितले असता आईने आरोपीकडे विचारणा केली, त्यावेळी आरोपीने तिला मारहाण केली व मारुन टाकण्याची धमकी दिली. त्यानंतर आरोपी हा वारंवार पिडिता ही घरात एकटी असताना तिच्या गुप्तांगाशी चाळे करायचा. पिडितेने फिर्यादीला असेही सांगितले की, तिची आई सकाळी ०७.३० वाजता कामावर जायची, त्यानंतर  तिचा लहान भाऊ शाळेत जायचा. पिडिता दुपारी १२-३० वाजता शाळेतून घरी परत यायची. त्यावेळी घरामध्ये केवळ ती व आरोपी हजर असायचे. त्यावेळी आरोपी पिडितेला नग्न करुन अंघोळ घालायचा, तिने अंघोळीला नकार दिला की तिच्या आईला व भावाला मारुन टाकण्याची धमकी तिला देत होता. पिडिता ही घाबरून गप्प बसली असताना आरोपी तिची छाती दाबायचा व तिच्या लघवीच्या ठिकाणी बोट लावायचा व ओरडल्यास तिचे तोंड दाबून तिला मराहाण करायचा. असे वारंवार आरोपीने तिचेसोबत केले." असे पिडितेने फिर्यादीला सांगितले असता तिने लगेच पिडितेला घेऊन पिडितेच्या घरी गेली व पिडितेच्या आईला झाले प्रकाराबाबत विचारणा केली व नंतर आरोपीला याबाबत विचारले असता त्याने तिला शिवीगाळ करुन घरातून हाकलून दिले. त्यानंतर दुस-या दिवशी पिडितेची आई फिर्यादीकडे आली व पिडितेबाबत का विचारले या कारणावरुन आरोपीने पिडितेच्या आईला हाताने, लाथाबुक्क्याने खूप मारहाण केली असल्याबाबत तिला सांगितले. त्यानंतर फिर्यादी ही पिडिता, तिची आई यांचेसह पोलीस स्टेशनला गेले व आरोपीविरुध्द रितसर तक्रार दाखल केली. तपास अधिकारी यांनी गुन्हयाचा तपास पूर्ण करुन आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. दिनांक २८/०८/२०२४ रोजी माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपीविरूध्द दोषारोप (निशाणी क्र.३०) निश्चित केले. आरोपीला त्याचेविरूध्द ठेवण्यात आलेले दोषारोप त्याला समजेल अशा भाषेमध्ये वाचून व समजावून सांगण्यात आले. आरोपीने

गुन्हा नाकबूल करून त्याचेविरूध्द खटला चालवावा असे सांगितले.

५. अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्द दोषारोप निश्चित केल्यानंतर अभियोग पक्षाने तीन साक्षीदारांची साक्ष याकामी नोंदवली. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र.१ फिर्यादी, साक्षीदार क्र.२ पिडिता व साक्षीदार क्र.३ पिडितेची आई यांनी अभियोग पक्षास सहकार्य न करता फितूर झाले. पुढील साक्षीदारांची तपासणी करुन कोणताही फलदायी उद्देश साध्य होणार नाही अशी पुरसीस अभियोग पक्षातर्फे अभिलेखावर दाखल केल्याने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. साक्षीदारांच्या पुराव्यातून आरोपीविरुध्द अभिलेखावर काहीही न आल्याने आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये जबाब नोंदविण्यात आला नाही.

६. अभियोग पक्षातर्फे विशेष सरकारी वकील श्रीमती ए. व्ही. भगत आणि आरोपीतर्फे वकील श्री. एस.पी.साळुंके यांचा युक्तिवाद ऐकला.

७. प्रस्तुत खटल्यातील हकीकतेच्या अनुषंगाने खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणांसह मी पुढे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, मार्च २०१७ ते जुलै २०१८ या कालाधीत शंकर कामठे यांची भाडयाची खोली, गल्ली नं. ३, लक्ष्मी नगर, कोंढवा बुद्रूक, पुणे येथे, आरोपी हा अल्पवयीन पिडिता वय वर्षे ११ हिचे नात्याने वडील असताना तिच्या लघवीच्या जागेत बोट घालून चाळे केले आणि तिच्यावर बलात्कार केला व त्यायोगे आरोपीने भारतीय दंड विधान कलम **३७६(२)(एफ)** अन्वयेचा अपराध केला..? | **... नकारार्थी.** |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपीने वर नमूद कालावधी व ठिकाणी व दरम्यानच्या वेळी, अल्पवयीन पिडिता वय वर्षे ११, जी वय १६ वर्षाखालील होती हिचेवर बलात्कार केला व त्यायोगे आरोपीने भारतीय दंड विधान कलम **३७६(२)(आय)** अन्वयेचा अपराध केला..? | **... नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपीने वर नमूद कालावधी व ठिकाणी व दरम्यानच्या वेळी, आरोपीने अल्पवयीन पिडिता वय वर्षे ११, जी अनुमती देण्यास समक्ष नव्हती हिचेवर बलात्कार केला व त्यायोगे आरोपीने भारतीय दंड विधान कलम **३७६(२)(जे)** अन्वयेचा अपराध केला..? | ... **नकारार्थी.** |
| ४. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपीने वर नमूद कालावधी व ठिकाणी व दरम्यानच्या वेळी, अल्पवयीन पिडिता वय वर्षे ११ हिचेवर वारंवार बलात्कार केला व त्यायोगे आरोपीने भारतीय दंड विधान कलम **३७६(२) (एन)** अन्वयेचा अपराध केला..? | ... **नकारार्थी.** |
| ५. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपीने वर नमूद कालावधी व ठिकाणी व दरम्यानच्या वेळी, अल्पवयीन पिडिता घटनेच्यावेळी सोळा वर्षाच्या आतील असताना तिचेवर बलात्कार केला व त्यायोगे आरोपीने भारतीय दंड विधान कलम **३७६(३)** अन्वयेचा अपराध केला..? | ... **नकारार्थी.** |
| ६. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपीने वर नमूद कालावधी व ठिकाणी व दरम्यानच्या वेळी, अल्पवयीन पिडिता वय वर्षे ११ हिला वेळोवेळी हाताने मारहाण करुन आपखुशीने दुखापत पोहोचवली व त्यायोगे आरोपीने भारतीय दंड विधान कलम **३२३** अन्वयेचा अपराध केला..? | ... **नकारार्थी.** |
| ७. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपीने वर नमूद कालावधी व ठिकाणी व दरम्यानच्या वेळी, अल्पवयीन पिडिता वय वर्षे ११ हिचेवर वेळोवेळी फौजदारी बलाचा वापर करून तिला हाताने मारहाण केली व तिच्या आईला मारहाण करण्याची दमदाटी केली, व त्यायोगे आरोपीने भारतीय दंड विधान कलम **५०६(१)** अन्वयेचा अपराध केला..? | ... **नकारार्थी.** |
| ८. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, | |



shonekanoon.com

| | | |
|---|---|---|
| | आरोपीने वर नमूद कालावधी व ठिकाणी व दरम्यानच्या वेळी, अल्पवयीन पिडिता वय वर्षे ११ हिचेवर लिंगभेदी लैंगिक अत्याचार केले व त्यायोगे आरोपीने लैंगिक गुन्हयापासून बालकांचे संरक्षण कायदा कलम **३(बी)** सह कलम **४(२)** अन्वयेचा अपराध केला? | **... नकारार्थी.** |
| ९. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपीने वर नमूद कालावधी व ठिकाणी व दरम्यानच्या वेळी, अल्पवयीन पिडिता वय वर्षे ११ हिचेवर वारंवार तीव्र लिंगभेदक लैंगिक अत्याचार केले, व त्यायोगे आरोपीने लैंगिक गुन्हयापासून बालकांचे संरक्षण कायदा कलम **५(एल)** सह कलम **६** अन्वयेचा अपराध केला? | **... नकारार्थी.** |
| १०. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपीने वर नमूद कालावधी व ठिकाणी व दरम्यानच्या वेळी, अल्पवयीन पिडिता वय वर्षे ११ ही १२ वर्षाखालील असल्याचे माहित असतानासुध्दा तिच्यावर तीव्र लिंगभेदक लैंगिक अत्याचार केले, व त्यायोगे आरोपीने लैंगिक गुन्हयापासून बालकांचे संरक्षण कायदा कलम **५(एम)** सह कलम **६** अन्वयेचा अपराध केला? | **... नकारार्थी.** |
| ११. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपीने वर नमूद कालावधी व ठिकाणी व दरम्यानच्या वेळी, अल्पवयीन पिडिता वय वर्षे ११ ही स्वतःची मुलगी असताना तिच्यावर तीव्र लिंगभेदक लैंगिक अत्याचार केले, व त्यायोगे आरोपीने लैंगिक गुन्हयापासून बालकांचे संरक्षण कायदा कलम **५(एन)** सह कलम **६** अन्वयेचा अपराध केला? | **... नकारार्थी.** |
| १२. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपीने वर नमूद कालावधी व ठिकाणी व दरम्यानच्या वेळी, अल्पवयीन पिडिता वय वर्षे ११ हिचेवर वारंवार तीव्र लैंगिक अत्याचार केले, व त्यायोगे आरोपीने लैंगिक गुन्हयापासून बालकांचे संरक्षण कायदा कलम **९(एल)** सह कलम **१०** अन्वयेचा अपराध केला? | **... नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| १३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपीने वर नमूद कालावधी व ठिकाणी व दरम्यानच्या वेळी, अल्पवयीन पिडिता वय वर्षे ११ ही १२ वर्षाखालील असल्याचे माहित असतानासुध्दा तिच्यावर तीव्र लैंगिक अत्याचार केले, व त्यायोगे आरोपीने लैंगिक गुन्हयापासून बालकांचे संरक्षण कायदा कलम **९(एम)** सह कलम **१०** अन्वयेचा अपराध केला? | **... नकारार्थी.** |
| १४. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपीने वर नमूद कालावधी व ठिकाणी व दरम्यानच्या वेळी, अल्पवयीन पिडिता वय वर्षे ११ ही स्वतःची मुलगी असताना तिच्यावर तीव्र लैंगिक अत्याचार केले, व त्यायोगे आरोपीने लैंगिक गुन्हयापासून बालकांचे संरक्षण कायदा कलम **९(एन)** सह कलम **१०** अन्वयेचा अपराध केला? | **... नकारार्थी.** |
| १५. | काय आदेश..? | **...सबळ पुराव्याअभावी आरोपीची निर्दोष सुटका करण्यात आली** |

## <u>का र ण मि मां सा</u>

८. अभियोग पक्षाने या प्रकरणी फिर्यादी, पिडिता व पिडितेची आई यांची साक्ष नोंदविली आहे. फिर्यादीला साक्षीदार क्र.१ म्हणून, पिडितेला साक्षीदार क्र.२ म्हणून, तर साक्षीदार क्र. ३ हिला पिडितेची आई म्हणून तपासले आहे.

### <u>मुद्दे क्र.१ ते १४ बाबत -</u>

९. वर नमूद सर्व मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने चर्चेच्या अनुषंगाने त्याची पुनरावृत्ती टाळण्याकरिता मी मुद्दयांचे कारणमिमांसा एकत्रीतपणे चर्चित आहे.

१०. अभियोग पक्षाने घटनेच्यावेळी अल्पवयीन होती ही बाब सिध्द करण्यासाठी तिचा जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, बोनाफाईड प्रमाणपत्र यापैकी कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. परंतु अभियोग पक्षाने पिडिता ही घटनेच्यावेळी अल्पवयीन होती हे सिध्द करण्यासाठी पिडितेचा वय तपासणी अहवाल निशाणी क्र.५६ अभिलेखावर दाखल केला आहे. सदरचा अहवाल

आरोपी पक्षातर्फे मान्य करण्यात आला आहे. वैद्यकीय अधिकारी यांनी पिडितेचे वय घटनेच्यावेळी १५ वर्षापेक्षा जास्त व १७ वर्षापेक्षा कमी असल्याचा अहवाल दिला आहे. अभियोग पक्षानुसार सदरची घटना ही मार्च २०१७ ते जुलै २०१८ या दरम्यान घडली आहे. सदर अहवालावरून असे दिसून येते की, घटना घडली त्या दिवशी पिडिता ही अल्पवयीन होती. पिडीतेच्या वयाबाबत आरोपीच्या वकिलांनी कुठलाही आक्षेप नोंदविला नाही. सबब, मी असा निष्कर्ष काढते की, पोक्सो कायद्याच्या तरतुदींनुसार आवश्यकतेनुसार अभियोग पक्षाने पिडीतेचे वय सिद्ध केले आहे व तिचे वय घटनेच्यावेळी १८ वर्षाच्या आतील होते ही बाब सिध्द होत आहे. परंतु असे असले तरी, सदर आरोपीनेच अल्पवयीन मलीला वारंवार हाताने मारहाण करुन दमदाटी केली व तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार करुन बलात्कार केला ही बाब निःसंशयपणे शाबित होणे गरजेचे आहे.

११. **साक्षीदार क्र. १ 'अ' तक्रारदार** हिने तिच्या पुराव्यात असे कथन केले की, आरोपी हा तिच्या मोठया बहिणीचा जावई आहे. पिडिता ही तिच्या मोठया बहिणीच्या मुलीची मुलगी आहे. घटनेच्यावेळी तिचे वय ११ वर्षे होते. सन २०१८ मध्ये पिडिता ही इयत्ता ७वी मध्ये शिकत होती. दिनांक ३०/०७/२०१८ रोजी तिच्या नातीचा वाढदिवस असल्यामुळे पिडिता तिच्या आई-वडिलांसह वाढदिवसाकरिता तिच्या घरी आली होती व वाढदिवस झाल्यानंतरदेखील दिनांक ०१/०८/२०१८ रोजीपर्यंत पिडिता तिच्याच घरी होती. दिनांक ०१/०८/२०१८ रोजी तिला घरी जाण्यास सांगितले असता ती घरी न जाता खालीच थांबली होती, तिने घटनेबद्दल तिला काहीही सांगितले नाही. असे घडले नाही की, मार्च २०१७ ते जुलै २०१८ पर्यंत आरोपीने त्याच्या राहते घरी पिडितेला घरी कोणी नसताना दमदाटी व शिवीगाळ केली, तिची छाती दाबली, ती अंघोळ करीत असताना तिची छाती चोखली, तसेच तिच्या लघवीच्या ठिकाणी बोटे घातली व तिचेवर वारंवार लैंगिक अत्याचार केले. फिर्याद निशाणी क्र.३६ मधील मजकूराबाबत तिला माहिती नाही.

१२. **साक्षीदार क्र.२ 'ब' पिडिता** हिने तिच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, सन २०१८ मध्ये ती आई-वडील व भाऊ यांचेसह राहत होती व ती इयत्ता ७वीत शिकत होती. सन २०१८ मध्ये तिच्या आजीने पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती, कारण तिचे वडील तिच्या आईशी भांडण करीत होते व मारहाण करीत होते. तिने तिच्या



shoneekapoor.com

आजीला तिच्यासोबत कोणतीही घटना घडल्याचे सांगितले नाही. असे काही घडले नाही की, ती तिच्या वडिलांसोबत घरी एकटी असताना तिच्या वडिलांनी घराचा दरवाजा बंद करुन तिला आणि तिच्या आईला मारहाण करण्याची धमकी देऊन तिची छाती दाबली, लघवीच्या ठिकाणी बोटाने चाळे केले व कोणास सांगितल्यास मारुन टाकेल अशी धमकी दिली.

१३. **साक्षीदार क्र.३ 'क' पिडितेची आई** हिने तिच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, सन २०१८ मध्ये ती तिचे पती, पिडिता व मुलगा यांचेसह राहत होती व पिडिता ही इयत्ता ७वीत शिकत होती. सन २०१८ मध्ये तिच्या मावशीने पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती, कारण तिचे पती तिच्याशी भांडण करीत होते व तिला मारहाण करीत होते. पिडितेने तिच्या मावशीला व तिला तिच्यासोबत कोणतीही घटना घडल्याचे सांगितले नाही. असे काही घडले नाही की, पिडिता ही तिच्या वडिलांसोबत घरी एकटी असताना पिडितेच्या वडिलांनी घराचा दरवाजा बंद करुन पिडितेला आणि तिला मारहाण करण्याची धमकी देऊन पिडितेची छाती दाबली, लघवीच्या ठिकाणी बोटाने चाळे केले व कोणास सांगितल्यास मारुन टाकेल अशी धमकी दिली.

१४. साक्षीदार क्र.१ ते ३ यांनी त्यांच्या साक्षीमध्ये घटनेबाबत काहीही न सांगितल्यामुळे त्यांना फितूर घोषित करून त्यांचा अभियोग पक्षातर्फे उलट तपास घेण्यात आला, उलट तपासात त्यांनी आरोपीने पिडितेचा लैंगिक छळ करुन तिच्यावर बलात्कार केला ही बाब नाकारून अभियोग पक्षास साहाय्य केले नाही, त्यामुळे साक्षीदारांच्या उलट तपासातूनही अभियोग पक्षाला आरोपीविरूध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आणता आला नाही.

१५. अभिलेखावर दाखल कागदपत्रे व पुराव्याचे अवलोकन केले असता मी या निष्कर्षाप्रत आले आहे की, अभियोग पक्ष गुन्हयाचे घटक सर्व वाजवी शंकेपलीकडे सिद्ध करण्यात पूर्णपणे अपयशी ठरला आहे. पिडिता, तक्रारदार व तिच्या आईची साक्ष विश्वासार्ह नसल्यामुळे आरोपीने सदरचा गुन्हा केला या निष्कर्षाप्रत मी येऊ शकत नाही. त्यामुळे अभियोग पक्षाने आरोपीविरूध्दचे आरोप सिध्द केलेले नाही या निष्कर्षाप्रत मी आलेले आहे व मी माझे उत्तर मुद्दे क्र.**१ ते १४** ला **'नकारार्थी'** नोंदवित आहे व आरोपी हा सदरहू आरोपातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे या निष्कर्षाप्रत मी आलेले आहे. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **महेश्वर बिंदूमाधव ठाकूर** यास भारतीय दंड विधान कलम **३७६(२)(एफ), ३७६(२)(आय), ३७६(२)(जे), ३७६(२)(एन), ३७६(३), ३२३, ५०६(१)** व बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा कलम **३(बी) सह कलम ४(२), ५(एल) सह कलम ६, ५(एम) सह कलम ६, ५(एन) सह कलम ६, ९(एल) सह कलम १०, ९(एम) सह कलम १०, ९(एन) सह कलम १०** अन्वयेच्या आरोपांमधून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २३५(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपी हा न्यायाधीन बंदी असल्यामुळे अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह, येरवडा, पुणे यांना आदेशित करण्यात येते की, सदर आरोपीची इतर कोणत्या गुन्हयात आवश्यकता नसल्यास त्याला या गुन्हयाच्याकामी तात्काळ सोडून दयावे.

३. आरोपीने कलम ४३७(अ) फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये **रुपये ५०,०००/-** (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) चा जामीन व जातमुचलका सहा महिन्याच्या कालावधीकरिता दयावा.

[ न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित केला ]

पुणे.
दिनांक - २५/११/२०२५.

**[ कविता दि. शिरभाते ]**
विशेष न्यायाधीश तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
पुणे

shoneekapoor.com

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file judgment are same word for word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | **Shri. D. L. Gudde,**<br>Stenographer (Grade-I) |
| Name of the Court | :- | **Smt. Kavita D. Shirbhate**<br>Special Judge &<br>District Judge- 11 &<br>Additional Sessions Judge, Pune. |
| Date of Judgment | :- | 25/11/2025 |
| Judgment checked & signed by presiding officer on | :- | 26/11/2025 |
| Judgment uploaded on | :- | 26/11/2025. |

shoneekapoor.com